# पुणे विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.

**डॉ. पंडीत एन्. शेळके**
एम्.एस्सी.,पीएच्.डी.
**प्र. कार्यक्रम समन्वयक**

कार्यालय क्र. : ०२०-२५६९७३४१
०२०-२५६०११५३
०२०-२५६०११६०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३४१


रासेयो/930/२०१३ दि. ११ नोव्हें २०१३

प्रति,
मा. प्राचार्य / कार्यक्रम अधिकारी
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा

**विषय : 'उत्कर्ष' राज्यस्तरीय सांस्कृतिक स्पर्धा निवड चाचणी शिबीराकरीता...**

मा. महोदय,

मा. राज्यसंपर्क अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय कक्ष, महाराष्ट्र शासन, मुंबई यांनी कळविल्यानुसार **'उत्कर्ष'** या **राज्यस्तरीय सांस्कृतिक स्पर्धेचे** आयोजन १४ ते १६ डिसेंबर २०१३ मध्ये **भारती विद्यापीठ, पुणे** येथे करण्यात आले आहे.

सदर स्पर्धा खालीलप्रमाणे ६ विभागात घेतली जाईल.

१. नृत्य : संकल्पना नृत्य (Creative Dance) (रासेयो संकल्पनेवर आधारीत)
२. नाटय : पथनाटय, एकपात्री अभिनय
३. संगीत : समूहगीत, भारतीय, घोषवाक्य
४. ललितकला : भित्तीचित्र, घोषवाक्य
५. साहित्य : निबंध, वादविवाद स्पर्धा
६. छायाचित्रण

वरीलप्रमाणे **'उत्कर्ष'** या सांस्कृतिक स्पर्धेकरीता पुणे विद्यापीठाचे ९ विद्यार्थी व ९ विद्यार्थीनी असे १८ जणांचा संघ सहभागी होणार असून सदर संघाच्या **निवड चाचणी शिबिराचे** आयोजन दि. २८ नोव्हेंबर २०१३ रोजी **सेवक विहार, पुणे विद्यापीठ, याठिकाणी** करण्यात आले आहे. तरी आपण आपल्या महाविद्यालयातील १ विद्यार्थी व १ विद्यार्थीनी (वरीलप्रमाणे स्पर्धेत विशेष प्राविण्य असणाऱ्या) यांना स. १०.०० वाजता निवडचाचणी शिबिराकरीता पाठवावे ही विनंती. कळावे,

टिप : निवड झालेल्या स्वयंसेवकास स्पर्धेपूर्वी १० दिवस सरावासाठी पुणे विद्यापीठात उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

आपला विश्वासू

प्र. कार्यक्रम समन्वयक
राष्ट्रीय सेवा योजना